ePaper
भुजबळांची अक्कल दाढ पडली; जरांगे पाटील यांचे भुजबळांना प्रत्युत्तर!
वर्ष - 9 । अंक -56 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™






www.mahaenews.com । शनिवार दि. 18 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महाएल्गार सभा: ओबीसींच्या हक्कांवर डाका टाकण्याचा प्रयत्न सुरु”-भुजबळ

# बीडमध्ये ओबीसींचा महाएल्गार!

## सभेत जातगणनेचे आवाहन: मंत्री छगन भुजबळांकडून जरांगे, विखेंना लक्ष्य

**। बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**बीड येथे झालेल्या ओबीसी महाएल्गार सभेत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी जातगणनेची गरज अधोरेखित करत मराठा समाज व ओबीसींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील व मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर केला. “आमचा मराठा समाजाशी कोणताही विरोध नाही, पण आमच्या हक्कांवर आक्रमण होत असेल, तर आम्ही गप्प बसणार नाही,” अशा शब्दांत भुजबळांनी आक्रमक भूमिका मांडली. या सभेत माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आमदार गोपीचंद पडळकर, ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके, प्रकाश शेंडगे, नवनाथ वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.**



मेळाव्याच्या सुरुवातीलाच भुजबळ यांनी उपस्थितांना शांतता व संयम राखण्याचे आवाहन केले. “काही लोक आपल्यामध्ये घुसवले गेले असावेत. काहींनी सुतळी बॉम्ब आणल्याची माहिती आहे. अशा गडबड करणाऱ्यांना ताबडतोब पोलिसांच्या हवाली करा. आपण शांततेने आपले विचार मांडूया,” असे त्यांनी सांगत वातावरण शांत ठेवण्याची विनंती केली.

**“आंतरवालीच्या पाटलांनी समाजांमध्ये फूट पाडली”**

छगन भुजबळ म्हणाले, “मराठा समाज आणि ओबीसी समाजामध्ये कुठलाही संघर्ष नाही. पण आंतरवालीच्या पाटलांनी दोन्ही समाजांमध्ये आंतर पाडण्याचे काम केले आहे. ओबीसींविषयी द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आम्ही विरोध करतोय तो अन्यायाचा, मराठा समाजाचा नाही.”

त्यांनी पुढे राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका करताना म्हटलं, “विखे पाटील जरांगे यांना भेटायला जातात, पण ओबीसी समाजाकडे दुर्लक्ष करतात. हैदराबाद गॅझेटनुसार निघालेल्या अध्यादेशात ‘पात्र’ हा शब्द एका तासात बदलला जातो. कुणबीसाठी सकाळी अर्ज केला की संध्याकाळी प्रमाणपत्र तयार! एवढी गतिमान यंत्रणा महाराष्ट्रात कधी झाली?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या मनोज जरांगे पाटील यांच्याशी झालेल्या भेटीवरही त्यांनी उपरोधिक शैलीत प्रहार केला. ““दाखव रे तो व्हिडिओ!’ असं म्हणत त्यांनी ती भेट उघडकीस आणावी,” असं सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे काँग्रेसवरही निशाणा साधला.

### “आरक्षण म्हणजे गरिबी हटाव नाही” — हाके

लक्ष्मण हाके यांनी आरक्षणाबाबत मत मांडताना म्हटलं, “आरक्षण म्हणजे गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. आरक्षण हे सामाजिक न्यायाचे साधन आहे. ओबीसींचे अधिकार संविधानाने दिले आहेत. कोणीही त्यावर डाका टाकू शकत नाही. जर ओबीसींच्या हक्कांवर गदा आली, तर आम्ही रस्त्यावर उतरू,” असा इशाराही त्यांनी दिला.

**जातगणनेचे आवाहन**

भुजबळ यांनी या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदींना थेट आवाहन करत म्हटलं, “देशात जातीनिहाय गणना होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कोणत्या समाजाची किती लोकसंख्या आहे, हे स्पष्ट होईल. सध्या ५४ टक्के ओबीसी, १३ टक्के दलित, ७ टक्के आदिवासी आणि ३ टक्के ब्राह्मण आहेत. मग उरलेल्या लोकसंख्येत किती टक्के मराठे आहेत? हे समोर आलेच पाहिजे.” त्यांनी पुढे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही उद्देशून टीका केली. “मुख्यमंत्र्यांनो, लक्षात ठेवा — काही मंडळी तुमच्या चांगल्यावर नाहीत, तर वाईटावर आहेत. त्यांचे लक्ष्य ओबीसी नाही, तर तुम्ही आहात,” असे त्यांनी स्पष्ट केले.

**“वाळूचोर आणि दारूवाले आंदोलनात” — भुजबळांचा घणाघात**

जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत झालेल्या आंदोलनावर बोलताना भुजबळ म्हणाले, “त्या आंदोलनात सहभागी झालेल्यांमध्ये बहुतांश वाळूचोर, दारूवाले होते. आम्ही काही गुन्हेगारांपासून घाबरणार नाही. जसे तुम्ही आदेश देता तसे आम्हीही देऊ शकतो,” असे सांगत त्यांनी इशाराच दिला.

**धनंजय मुंडे यांची संतुलित भूमिका**

या सभेत माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडे यांनीही जरांगे पाटील यांच्यावर थेट नाव न घेता अप्रत्यक्ष टीका केली. “मराठा समाज आमचा विरोधक नाही. आम्ही त्यांना १० टक्के आरक्षण दिलं आहे. त्यांनी ते घ्यावं. मात्र, ओबीसींच्या आरक्षणावर कुठलाही आघात सहन केला जाणार नाही,” असे ते म्हणाले.

मुंडे यांनी या वेळी ओबीसी समाजातील आत्महत्या करणाऱ्या व्यक्तींच्या कुटुंबांना २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणीही केली. “या समाजातील अनेकांनी आपल्यावर झालेल्या अन्यायामुळे आयुष्य संपवलं. सरकारने त्यांच्या कुटुंबियांची जबाबदारी घ्यायला हवी,” असे त्यांनी ठामपणे सांगितले.

**प्रस्ताव दिवाळीनंतर** — सात गावांतील ड्रोन सर्वेक्षण पूर्ण

# विमानतळ मोबदल्याचा प्रस्ताव दिवाळीनंतर

## प्रस्ताव सरकारला पाठविण्यात येईल

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावांमधील १ हजार २८५ हेक्टर जागेचे ड्रोन सर्वेक्षण जिल्हा प्रशासनाकडून पूर्ण करण्यात आले आहे. मात्र, येत्या दोन दिवसांमध्ये प्रत्यक्षात जागेची मोजणीप्रक्रिया पूर्ण होणार असून, ही प्रक्रिया मुदतीपूर्वी पूर्ण होणार असल्याचा दावा जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. दरम्यान, विमानतळाच्या भूसंपादनासाठी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मोबदल्याचा प्रस्ताव दिवाळीनंतर राज्य शासनाला पाठविण्यात येणार आहे.**



पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतिपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणीप्रक्रिया जिल्हा प्रशासनाकडून सुरू करण्यात आली होती. पुरंदर तालुक्यातील एखतपूर, उदाचीवाडी, मुंजवडी, खानवडी, कुंभारवळण, खानवडी आणि पारगाव अशा सात गावांमधून १ हजार २८५ हेक्टर म्हणचे तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी ३ हजार २०० शेतकऱ्यांनी २ हजार ८१० एकर जागा देण्यासंदर्भातील संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाला दिली आहेत.विमानतळासाठीच्या सात गावांतील जमिनीचे ड्रोन सर्वेक्षण करून मोजणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार १ हजार २८५ हेक्टर जमिनीची मोजणी पूर्ण झाल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. मात्र, प्रत्यक्ष जागेची मोजणी अंतिम टप्प्यात असून ती दोन दिवसांमध्ये पूर्ण होईल, असा दावाही त्यांनी केला.‘तालुक्यातील एखतपूरमध्ये २०१ हेक्टर, मुंजवडीत १०० हेक्टर, उदाचीवाडीत ५९ हेक्टर, कुंभारवळणात २६३ हेक्टर, वनपुरीत १८३ तसेच खानवडीत २९८ हेक्टर आणि पारगावमध्ये १२३ हेक्टर इतक्या जागेची मोजणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरीत सुमारे ६० ते ६४ हेक्टर जमिनीची दोन दिवसांत मोजणी पूर्ण होईल, असे डुडी यांनी सांगितले.मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. जमिनीची मोजणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांशी दिवाळीनंतर चर्चा करण्यात येईल. त्यानंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदल्याचा प्रस्ताव सरकारला पाठविण्यात येईल. त्यानंतर प्रत्यक्ष भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू होईल. पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतिपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणीप्रक्रिया जिल्हा प्रशासनाकडून सुरू करण्यात आली होती. पुरंदर तालुक्यातील एखतपूर, उदाचीवाडी, मुंजवडी, खानवडी, कुंभारवळण, खानवडी आणि पारगाव अशा सात गावांमधून १ हजार २८५ हेक्टर म्हणचे तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी ३ हजार २०० शेतकऱ्यांनी २ हजार ८१० एकर जागा देण्यासंदर्भातील संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाला दिली आहेत.विमानतळासाठीच्या सात गावांतील जमिनीचे ड्रोन सर्वेक्षण करून मोजणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार १ हजार २८५ हेक्टर जमिनीची मोजणी पूर्ण झाल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. मात्र, प्रत्यक्ष जागेची मोजणी अंतिम टप्प्यात असून ती दोन दिवसांमध्ये पूर्ण होईल, असा दावाही त्यांनी केला.‘तालुक्यातील एखतपूरमध्ये २०१ हेक्टर, मुंजवडीत १०० हेक्टर, उदाचीवाडीत ५९ हेक्टर, कुंभारवळणात २६३ हेक्टर, वनपुरीत १८३ तसेच खानवडीत २९८ हेक्टर आणि पारगावमध्ये १२३ हेक्टर इतक्या जागेची मोजणी पूर्ण करण्यात आली आहे

### शेतकऱ्यांशी दिवाळीनंतर चर्चा

. उर्वरीत सुमारे ६० ते ६४ हेक्टर जमिनीची दोन दिवसांत मोजणी पूर्ण होईल, असे डुडी यांनी सांगितले.मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. जमिनीची मोजणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांशी दिवाळीनंतर चर्चा करण्यात येईल.

# शिधा दुकानदारांना लाभ रकमेची प्रतीक्षा

## शिधा दुकानदारांना दिवाळी तोंडावरही मार्जिन थकित

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरासह जिल्ह्यातील सुमारे अडीच हजार शिधा दुकानदारांचे जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांचे मार्जिन (लाभ रक्कम) राज्य शासनाने दिलेले नाही. मात्र, अर्थ विभागातून कमिशनसाठीचा निधी अन्नधान्य पुरवठा विभागाला उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, बँक खात्यामध्ये ही रक्कम जमा न झाल्याने शिधा दुकानदारांमध्ये नाराजी आहे.**



राज्यातील सर्व रास्त भाव दुकानदारांना देय असलेले प्रलंबित दिवाळीपूर्वी अदा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार, दिवाळीपूर्वी प्रत्येक जिल्ह्यातील शिधा दुकानदारांना मार्जिन मिळावे, अशी सूचना राज्य शासनाने केली आहे. मात्र, अद्याप कमिशन मिळाले नसल्याचे शहर आणि जिल्ह्यातील रेशन दुकानदारांनी तक्रारी केल्या आहेत.शहरात ७५५, तर जिल्ह्यात १ हजार ८५९ असे सुमारे अडीच हजार शिधा दुकानदार आहेत. पुणे शहर जिल्ह्यातील रेशन दुकानदारांचे जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांचे कमिशन रखडले आहे. २५ ऑगस्टपूर्वी प्रतिक्विंटल १५० रुपये असे कमिशन आकारण्यात आले आहे. मात्र, कमिशनवाढीच्या मागणीनंतर प्रतिक्विंटल १७० रुपये दर हा २५ ऑगस्टनंतर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार १५० रुपये प्रति क्विंटलनुसार, जून ते ऑगस्टदरम्यानचे कमिशन दिले जाणार आहेमात्र, त्यांच्याकडून दिवाळीपूर्वी मार्जिन देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. तसेच अर्थ विभागाने कमिशनसाठीची रक्कम पुरवठा अधिकाऱ्यांकडे पाठविली आहे. मात्र, अद्याप ती मिळालेली नाही,

### ८० लाख रुपयांची रक्कम जमा

’यांनी सांगितले.दरम्यान, सरकारकडून जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचा निधी उपलब्ध झाला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत शिधा दुकानदारांच्या खात्यात कमिशनची रक्कम जमा होईल. सुमारे एक कोटी ८० लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात येईल, असे शहर अन्न वितरण अधिकारी प्रशांत खताळ यांनी सांगितले. पावणेदोन कोटींची रक्कम जमा करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार तीन महिन्यांच्या कमिशनची रक्कम ऑनलाइन स्वरुपात दोन ते तीन दिवसांत ती जमा होईल.

DPU SUPER SPECIALTY HOSPITAL
(A Unit of Dr. D.Y. Patil Medical College, Hospital & Research Centre)
PIMPRI, PUNE



डॉ. पी. डी. पाटील
कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.)
पिंपरी, पुणे
(अभिमत विद्यापीठ)



डॉ. सौ. भाग्यश्रीताई पी. पाटील
प्र-कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.)
पिंपरी, पुणे
(अभिमत विद्यापीठ)



डॉ. यशराज पी. पाटील
विश्वस्त खजिनदार
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.)
पिंपरी, पुणे
(अभिमत विद्यापीठ)

# जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सर्व सेवा सुविधांनी परिपूर्ण रुग्णालय

अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ आणि तत्पर उपचार उत्तम रुग्णसेवेसाठी आम्ही वचनबद्ध आहोत.




For more details, visit our website

- रोबोटिक सर्जरी सेंटर
- कृत्रिम गर्भधारणा व एन्डोस्कोपी सेंटर
- अवयव प्रत्यारोपण सेंटर
- हृदयरोग शस्त्रक्रिया
- TAVI क्लिनिक
- अत्यावश्यक वैद्यकीय सेवा
- मज्जासंस्था (न्यूरो) उपचार
- मूत्रविकार व मूत्रपिंड उपचार
- श्वसन व पोटाचे आणि त्वचारोग उपचार
- कॉक्लियर इम्प्लांट
- अस्थिरोग व रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रिया
- माता आणि बाल विभाग (45 बेडस् चे नवजात अतिदक्षता विभाग व अत्याधुनिक स्वतंत्र प्रसूती संकुल)
- अत्याधुनिक रेडिओलॉजी विभाग

2011 बेड्स | 181 अतिदक्षता विभाग बेड्स | 32 अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह | 24 प्रशस्त ओपीडी

**मोफत प्रसूती (नॉर्मल डिलिव्हरी व सिझेरियन) ची सुविधा उपलब्ध.**

स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग व वेलनेस सेंटर | सुसज्ज आंतररुग्ण विभाग | PMJAY / MJPJAY / RBSK / CGHS / CSMA /ECHS /MPKAY / Central Railway / ESIS / Dhanwantari gold scheme PCMC / शहरी गरीब आरोग्य योजना PMC सर्व शासकीय व खाजगी विमा संरक्षण (इन्शुरन्स) तसेच कॉर्पोरेट कंपनीशी संलग्न आरोग्य विमा संरक्षण

कॉल सेंटर क्र: + 91 706 599 5999 | प्रायव्हेट ओ.पी.डी. क्र: 020-6711 6401
आपत्कालीन संपर्क: 020-6711 6469 | रुग्णवाहिका क्र: +91 888 080 2020
डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय आणि संशोधन केंद्र, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे - 411 018

info@dpuhospital.com | www.dpuhospital.com

**दोन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव** | **पिंपरी चिंचवडमध्ये 9 अधिकारी पदांना मंजुरी**

# पोलीस ठाण्यांची संख्या 24 होणार!

## विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही सुरू, सप्ताहांत कार्यशाळांतून प्रत्यक्ष अनुभवाची संधी

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पोलिसांकडून चाकण, म्हाळुंगे एमआयडीसी भागात नव्याने दोन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्याला शासनाच्या उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली आहे. चाकण पोलीस ठाण्याचे विभाजन करून चाकण दक्षिण आणि म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे विभाजन करून उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे तयार केले जाणार आहे. त्यामुळे पोलीस ठाण्यांची संख्या २४ होणार आहे. तसेच तीन उपायुक्त, सहा सहायक आयुक्त पदांना देखील मंजुरी देण्यात आली आहे.**




> “चाकण दक्षिण, उत्तर म्हाळुंगे पोलीस ठाण्यांना उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली आहे. तीन उपायुक्त, सहा सहायक आयुक्त पदांनादेखील मंजुरी मिळाली आहे.
> **-डॉ. शिवाजी पवार,** पोलीस उपायुक्त

### चौथ्या परिमंडळाचा प्रस्तावही शासनाकडे

सध्या आयुक्तालयांतर्गत तीन परिमंडळांमध्ये २२ पोलीस ठाणे आहेत. नवी दोन ठाणे सुरू झाल्यानंतर पोलीस ठाण्यांची संख्या २४ होणार आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी चौथ्या परिमंडळाच्या निर्मितीबाबतचा प्रस्तावही शासनाकडे पाठवण्यात आला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्येक परिमंडळाखालील ठाण्यांची संख्या संतुलित होईल, असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

पोलीस आयुक्तालयांतर्गत सध्या तीन परिमंडळांमध्ये प्रत्येकी एक, गुन्हे शाखा, मुख्यालय आणि वाहतूक शाखा यासाठी प्रत्येकी एक असे सहा उपायुक्त आहेत. वाहतूक शाखा उपायुक्त पदासाठी अपर पोलीस आयुक्त पद अवनत करण्यात आले आहे. त्यामुळे सध्या सहा पोलीस उपायुक्त उपलब्ध आहेत. नव्याने तीन उपायुक्त पदांच्या प्रस्तावाला अंतिम मान्यता(वायरलेस) सहायक आयुक्त अशी १९ पदे उपलब्ध होणार आहेत.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत तीन परिमंडळ आहेत. त्यामध्ये २२ पोलीस ठाणे आहेत. चाकण दक्षिण आणि उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी या दोन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीनंतर पोलीस ठाण्यांची संख्या २४ होणार आहे. तीन परिमंडळांमध्ये प्रशासकीय ताण वाढणार असल्याने परिमंडळांची संख्या देखील वाढवली जाणार आहे. चौथ्या परिमंडळाच्या मंजुरीबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. त्याला देखील लवकरच मान्यता मिळण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी सांगितले. आयुक्तालयांतर्गत अपर पोलीस आयुक्तांची दोन पदे मंजूर आहेत.

मात्र त्यातील एक पद अवनत केले आहे. त्यामुळे सध्या एकच अपर आयुक्त पद कार्यरत आहे. उपायुक्तांनी तीन पदे मंजूर झाल्यानंतर उपायुक्तांची संख्या पुरेशी होईल.

त्यानंतर अवनत केलेले पद पुन्हा पूर्ववत करून अपर पोलीस आयुक्तांची दोन पदे होणार आहेत.

# औद्योगिक पट्टयातील वीज सक्षमीकरणासाठी “बुस्टर”

## कॅनबे चौक येथे नवीन उपकेंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा- भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**तळवडेसह लगतचा चाकण औद्योगिकपट्टा परिसरातील परिसरातील वीज समस्येवर तोडगा काढण्यासाठी आता नवीन वीज उपकेंद्र (स्विचिंग स्टेशन) उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) च्या कार्यक्षेत्रातील संबंधित जागा महावितरणकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.**




> “पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासाठी वीज पुरवठा सक्षम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तळवडे भागातील वीज समस्येवर सातत्यपूर्ण पाठपुरावा करत, नवीन उपकेंद्र उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या उपकेंद्रामुळे वीज ग्राहकांना आणि उद्योजकांना सक्षम वीज पुरवठा मिळेल, असा विश्वास आहे. आम्ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली वीज समस्यांचा निराकरण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.”
> **-- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

तळवडे भागात वाढती लोकसंख्या आणि वीजेची मागणी यामुळे देवी इंद्रायणी उपकेंद्रावर अतिरिक्त वीजभार पडला आहे. या उपकेंद्रावर भार वाढला आहे, त्यामुळे गेली 10 वर्षे वीज पुरवठा व्यवस्थेत अडचणी येत आहेत. 2018 मध्ये कॅनबे चौक येथे नवीन उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले होते, पण जागेची समस्या असल्यामुळे कामाला प्रारंभ होऊ शकला नव्हता. याबाबत आमदार महेश लांडगे यांनी महावितरण, एमआयडीसी आणि उर्जा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.

तसेच, महावितरणचे व्यवस्थापक विश्वास पाठक यांच्यासोबत झालेल्या बैठकीत महेश लांडगे यांनी यावरील उपाययोजना प्रस्तावित केली होती. त्यानंतर, दि. 13 ऑक्टोबर 2025 रोजी MIDC ने सदर जागा MSEB ला हस्तांतरित केली आहे, ज्यामुळे नवीन उपकेंद्र उभारण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. आमदार लांडगे म्हणाले की, 2014 पासून आम्ही भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे मार्गी लावली. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यात येत आहेत. त्यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली असा “रेसिडेन्सिअल कॉरिडॉर” विकासित झाला. लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढली. त्याचसोबत वीज ग्राहक संख्याही वाढली. त्या तुलनेत वीज पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याची आवश्यकता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही भोसरी वीज उपकेंद्राचे विभाजनकरून चऱ्होली आणि दिघी उपकेंद्र निर्मिती करण्यात आली. इन्फ्रा- १ ची कामे पूर्ण झाली आहेत. इन्फ्रा- २ ची कामे प्रगतीपथावर आहेत.

# साट्यालोट्याच्या योजनेला दणका



## भूमिका

**निवडणूक रोख्यांची केंद्राची योजना सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवली. बड्या कंपन्या वा शक्तींनी आर्थिक बळाच्या जोरावर सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकू नये, यासाठी जी खंबीर भूमिका घेतली ती देशाला फार मोठा दिलासा देणारी आहे. आपले सर्वोच्च न्यायालय लोकशाहीचा एक भक्कम आधारस्तंभ म्हणून अद्यापही काम करीत आहे, हे या निर्णयातून दिसून आले.**



राजकीय पक्षांना उद्योगधंद्यांनी निधी देणे, ही काही नवी गोष्ट नाही. अगदी स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही राजकीय पक्षांना काही व्यापारी घराण्यांनी विविध प्रकारे मदत केलीच आहे. त्यानंतरही वेगवेगळ्या प्रकारे हा ओघ चालू राहिला. परंतु त्याला यंत्रणात्मक स्वरूप देताना सर्वांत वादग्रस्त ठरलेली योजना म्हणजे २०१७ मध्ये आलेली केंद्र सरकारची 'इलेक्टोरल बॉण्ड्स'ची (निवडणूक रोखे) योजना.या योजनेला अनेकांनी उद्योजक व पुढारी यांच्यातले साटेलोटे म्हणजेच 'तुम्ही माझी पाठ खाजवा, मी तुमची खाजवतो' असे लेबल लावले होते. ही योजना बड्या उद्योगसंस्था आणि राजकीय पक्षांमधील एक परस्परांचे हितसंबंध सांभाळणाऱ्या व्यवस्थेला प्रोत्साहन देत होती. त्यामुळे विरोधी पक्षांपेक्षा सत्ताधारी पक्षाचे अधिक फावले. निवडणूक रोखे योजनेच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२अंतर्गत दाखल करण्यात आल्या होत्या. याचिकांमध्ये 'वित्त कायदा २०१७' च्या तरतुदींनाही आव्हान देण्यात आले. त्याचबरोबर 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा-१९३४', 'लोकप्रतिनिधी कायदा-१९५१', 'प्राप्तिकर कायदा-१९६१' यांच्या तरतुदीतही बदल करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. त्यामध्ये 'माहिती तंत्रज्ञान कायदा' आणि 'कंपनी कायदा-२०१३' चाही समावेश होता. केंद्र सरकार याबाबत प्रचंड उत्साही असताना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जानेवारी २०१७ मध्ये अर्थमंत्रालयातील संयुक्त सचिवांना पत्र लिहून या योजनेबद्दल आपली काही निरीक्षणे सादर करताना काही मुद्यांवर हरकत घेतली होती. विशेषतः देणगीदाराचा तपशील गोपनीय ठेवणे हे उघडउघड पारदर्शित्वाच्या तत्त्वालाच मुरड घालणारे आहे, यावर बोट ठेवले होते. हा आक्षेप खरेतर रास्त होता. मात्र, त्यावर "रिझर्व्ह बँकेला या योजनेचा मूळ उद्देशच समजला नाही," असे नमूद करणारे पत्र मंत्रालयाने उत्तरादाखल पाठवले. रिझर्व्ह बँकेने निवडणूक रोखे योजना केंद्रीय मंडळासमोर चर्चेसाठी ठेवली. समितीने या योजनेबाबत गंभीरपणे काही आक्षेप नोंदवले. रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २०१७ मध्ये अर्थमंत्र्यांना निरीक्षणे कळवली होती. दरम्यान, मे २०१७ मध्ये निवडणूक आयोगाने कायदा आणि न्याय मंत्रालयालाही पत्र लिहिले की, वित्त कायद्यान्वये प्रस्तावित करण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान कायदा, लोकप्रतिनिधी कायदा आणि कंपनी कायद्यातील प्रस्तावित सुधारणा प्रत्यक्षात आल्यास राजकीय पक्षांच्या वित्त/निधीच्या पारदर्शकतेवर गंभीर परिणाम होतील. रोख्यांद्वारे देणग्या मिळाल्यास त्या उघड करणे बंधनकारक नसेल तर, हे नक्कीच प्रतिगामी पाऊल ठरेल. तरीही दोन जानेवारी २०१८ रोजी अर्थमंत्रालयाने 'आरबीआय कायद्या'च्या कलम ३१(३) अंतर्गत निवडणूक रोखे योजना २०१८ अधिसूचित केली. निवडणूक रोखे 'प्रॉमिसरी नोट'च्या स्वरूपात जारी केले गेले. त्यावर खरेदीदाराच्या नावाचा उल्लेख नव्हता. यामुळे पुढील व्यक्तींना रोखे खरेदी करणे शक्य होते - १) भारताचा नागरिक, २) भारतात स्थायिक झालेला व्यक्ती.यातील 'व्यक्ती'मध्ये अ) एक व्यक्ती एकट्याने किंवा इतर व्यक्तींसह संयुक्तपणे समाविष्ट आहे, तसेच (ब) हिंदू अविभक्त कुटुंब, (क) एखादी कंपनी (ड) छोटी संस्था (फर्म) (इ) संघटना किंवा संस्था (ई) वरीलपैकी कोणत्याही श्रेणीत न बसणारी, पण न्यायाच्या कक्षेत येणारी व्यक्ती (फ) अशा व्यक्तीच्या मालकीची किंवा तिने नियंत्रित केलेली कोणतीही एजन्सी, कार्यालय किंवा शाखा.तसेच, खरेदीदाराने दिलेली माहिती संबंधित बँकेने गोपनीय ठेवायला हवी आणि केवळ न्यायालयाच्या किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने मागणी केल्यावर उघड करावी, असा उल्लेख होता.

## प्रासंगिक »

### आगेमागे

***इशित 'केबीसी'त जिंकला असता, तर अशाच प्रतिक्रिया उमटल्या असत्या का? त्या वेळी कदाचित त्याच्या या अशा 'दिसण्या'चे स्मार्टनेस म्हणून कौतुक झाले असते***

एखाद्या घटनेचे इंटरनेटवर वादळ निर्माण होणे हे आजच्या डिजिटल काळात काही नवीन नाही. ती या जगात टिकून राहण्यासाठीची गरज आहे. पण वादळ असले तरी डिजिटलच ते. काही दिवसांनी वा आठवड्यांनी त्याचा परिणामही उरत नाही. याचीही या डिजिटल जगताला सवय, कारण हे विरले तरी पुढचे वादळ तयार असते किंवा मिळवले, निर्माण केले जाते. जागतिक तापमानवाढीमुळे कमी वेळात अधिक पाऊस पडण्याच्या घटना जशा सातत्याने वर्षभर आताशा कुठे ना कुठे घडत असतात, तशीच कमी वेळात अशी जोरदार डिजिटल वादळे सातत्याने मोबाइल, दूरचित्रवाणी, संगणक अशा आधुनिक पडद्यांना धडका देत राहतात. त्यातील अलीकडचे वादळ हे गुजरातच्या गांधीनगरमधील इशित भट्ट नावाच्या मुलाच्या 'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमातील वर्तनाने निर्माण झालेले.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अयोध्येतील बहुप्रतीक्षित मंदिरात रामलल्लाची प्रतिष्ठापना केल्यावर आता सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशात संभळ येथे 'कल्की धाम मंदिरा'चेही भूमिपूजन केले. मात्र, त्याचवेळी त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक प्रचाराला नवी दिशाही दिली, त्याचे महत्त्व अधिक आहे.

# सुसाटलेले नि भरकटलेले!

'कालचक्र बदलले असून, नवे युग अवतरले आहे!' हे त्यांचे उद्‌गार 'आपण स्वत: युगप्रवर्तक आहोत,' असा अहंभाव मिरवणारेच होते. शिवाय, एकीकडे देशात मंदिरे उभारली जात असली, तरी 'भारतरूपी मंदिर' उभारण्याची जबाबदारी आपल्यावर साक्षात परमेश्वरानेच सोपवली आहे!' असेही त्यांनी ठासून सांगितले. तर मंगळवारी काश्मीरमध्ये बोलताना त्यांनी सनातन धर्माचा मुक्तकंठाने जयजयकार केला. पंतप्रधान अशा रीतीने या निवडणुकीचेच नव्हे तर देशाच्या पुढच्या वाटचालीचीही दिशा ठरवू पाहात आहेत, असे दिसते. भाजप आणि विशेषत: मोदी यांच्याविरोधात जोमाने उभ्या ठाकलेल्या 'इंडिया आघाडी'च्या मात्र रोजच्या रोज चिरफळ्या उडत चालल्या आहेत. राहुल गांधी यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' उत्तर प्रदेशात आली असतानाच, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी काँग्रेसपुढे भले मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे.'आधी जागावाटपाचा तिढा सोडवा तरच



आपण या 'यात्रे'त सहभागी होऊ, अशी अटच अखिलेश यांनी घातली आहे आणि त्यासाठी समाजवादी पक्षाने देऊ केलेल्या १७ जागांवर काँग्रेस समझोता करण्याची शक्यता अगदीच धूसर असल्याचे चित्र मंगळवारी समोर आले आहे. खरे तर ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या या 'यात्रे'त 'इंडिया आघाडी'तील घटक पक्षांनी सहभागी होणे अपेक्षित होते.मात्र, या आघाडीत कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही, अशी स्थिती असल्यामुळे ही 'यात्रे'च्या या अर्ध्याअधिक प्रवासात कोठेही राहुल गांधी यांना सहप्रवासी मिळवता आला नाही. विरोधकांमधील मातब्बरांना त्यांच्यावर आपणच केलेल्या आरोपांची पर्वा न करता, आपल्या छावणीत आणण्याचे काम महाराष्ट्रापासून राजस्थानपर्यंत भाजप जोमाने करत आहे. मध्य प्रदेशातही माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे बडे नेते कमलनाथ यांचे तळ्यात-मळ्यात सुरू आहे. अर्थात, ही भाजपची आक्रमकता आहे की अगतिकपोटी त्यांना हे करावे लागत आहे, हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे.मात्र, त्यामुळे विरोधी पक्षांचे खच्चीकरण मात्र वेगाने होत आहे. एकीकडे पंतप्रधान प्रचारमोहिमेला देत असलेली वेगळी दिशा आणि त्याचवेळी विरोधी पक्षांना नेस्तनाबूत करण्याची ही खेळी असा दुहेरी डाव भाजप टाकत आहे. त्याचवेळी राहुल मात्र एका वेगळ्याच विश्वात रममाण होऊन 'प्यार बाँटने की' भाषा करत आहेत! खरे तर अखिलेश यादव देऊ करत असलेल्या १७ जागांवर समाधान मानून, काँग्रेसने ते आपल्यासोबत राहतील, असा निर्णय घेतला तर अखिलेश यांच्या सहभागाने राहुल यांच्या यात्रेतून किमान उत्तर प्रदेशात तरी वेगळे चित्र उभे राहू शकते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

यंदा दिवाळी नाही

## अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने निर्णय

# शरद पवार पक्षाकडून यंदा दिवाळी नाही!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून राज्यात यंदा दिवाळी साजरी करण्यात येणार नसल्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शुक्रवारी जाहीर केले. राज्य सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत केली नसल्याची खंत पवार यांनी व्यक्त केली. बारामतीत गोविंद बाग येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पवार यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, 'प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी संघटनेच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून पक्षाकडून यंदा दिवाळी साजरी करायची नसल्याचा निर्णय घेतला आहे.**

## दिवाळी रद्द केल्याची घोषणा



राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकरी अस्वस्थ असून, दिवाळी साजरी करण्याच्या मनस्थितीत नाही. त्यामुळे पक्षाने दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे.''राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्यात आलेली नाही. या प्रकरणात राजकारण आणले जात आहे. आम्हाला यात राजकारण करायचे नाही. मात्र, ज्यांच्या ताब्यात राज्याची सत्ता आहे, त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे. राज्य सरकारने केलेली मदत कमी आहे. त्यातून कुठलेही नुकसान भरून येऊ शकत नाही.' अशी टीकाही पवार यांनी केली.'मतदार यादीवरून महाविकास आघाडीतील पक्ष नाराज आहेत. याविषयी निवडणूक आयोगासमोर सर्व गोष्टी मांडण्यात आल्या आहेत. पुढे काय होणार याकडे लक्ष आहे,'=

असेही पवार म्हणाले. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून राज्यात यंदा दिवाळी साजरी करण्यात येणार नसल्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शुक्रवारी जाहीर केले. राज्य सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत केली नसल्याची खंत पवार यांनी व्यक्त केली. बारामतीत गोविंद बाग येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पवार यांनी ही माहिती दिली.

ते म्हणाले, 'प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी संघटनेच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून पक्षाकडून यंदा दिवाळी साजरी करायची नसल्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या

### शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक

राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकरी अस्वस्थ असून, दिवाळी साजरी करण्याच्या मनस्थितीत नाही. त्यामुळे पक्षाने दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे.''राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्यात आलेली नाही. या प्रकरणात राजकारण आणले जात आहे. आम्हाला यात राजकारण करायचे नाही. मात्र, ज्यांच्या ताब्यात राज्याची सत्ता आहे, त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे.

प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकरी अस्वस्थ असून, दिवाळी साजरी करण्याच्या मनस्थितीत नाही. त्यामुळे पक्षाने दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे.''राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्यात आलेली नाही. या प्रकरणात राजकारण आणले जात आहे. आम्हाला यात राजकारण करायचे नाही. मात्र, ज्यांच्या ताब्यात राज्याची सत्ता आहे, त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे. राज्य सरकारने केलेली मदत कमी आहे. त्यातून कुठलेही नुकसान भरून येऊ शकत नाही.' अशी टीकाही पवार यांनी केली.'मतदार यादीवरून महाविकास आघाडीतील पक्ष नाराज आहेत. याविषयी निवडणूक आयोगासमोर सर्व गोष्टी मांडण्यात आल्या आहेत. पुढे काय होणार याकडे लक्ष आहे,' असेही पवार म्हणाले. यंदा दिवाळी साजरी करण्यात येणार नसल्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शुक्रवारी जाहीर केले. राज्य सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत केली नसल्याची खंत पवार यांनी व्यक्त केली. बारामतीत गोविंद बाग येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पवार यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, 'प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी संघटनेच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून पक्षाकडून यंदा दिवाळी साजरी करायची नसल्याचा निर्णय घेतला आहे.

# स्वतंत्रपणे काम करण्याची आवश्यकता

## राजकारण्यांनी काम करण्याची आवश्यकता : कुबेर यांचे प्रतिपादन

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**समाजहितासाठी प्रशासन, माध्यमे आणि राजकारण्यांनी स्वतंत्रपणे काम करण्याची गरज आहे. या तिघांनी एकत्रपणे काम केल्यास समाज व्यवस्थेचा ऱ्हास होतो. भ्रष्टाचार वाढतो आणि अखेरीस समाजाचे मोठे नुकसान होते, असे प्रतिपादन संपादक गिरीष कुबेर यांनी केले.**

एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई आणि यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या संयुक्त विद्यमान दिवंगत शरद काळे स्मृतीव्याख्यानात 'प्रशासन, माध्यमे आणि राजकारण : नवे समीकरण' या विषयावर कुबेर बोलत होते.धर्मसत्तेकडून होणाऱ्या लैंगिक शोषणावर प्रहार करणाऱ्या स्पॉट लाईट या चित्रपटातील एका प्रसंगाचा दाखला कुबेर यांनी दिला, चुकीच्या गोष्टी दडपण्यासाठी संपादकांवर माध्यम, प्रशासन आणि धर्मसत्तेने एकत्रपणे काम करण्यासाठी दबाव आणला जातो. पण, संपादक या तिघांनी एकत्रपणे काम न करता स्वतंत्रपणे काम करण्याची गरज असल्याचे अत्यंत ठामपणे सांगतात.आज आपल्याकडे ही याची निकड जाणवते. प्रशासनातून निवृत्त होऊन किंवा राजीनामा देऊन



एखादा अधिकारी थेट निवडणूक लढवितो. सरन्यायाधीश पदावरून निवृत्त होताच एखाद्या लहान राज्याचे राज्यपाल होतात. एखादा पोलिस अधिकारी राजीनामा देऊन थेट निवडणूक रिंगणात उतरतो आणि एखाद्या वृत्तपत्राचा संपादक निवृत्त होताच राज्यसभेचा सदस्य होतो, असे चित्र आपण सर्रास पाहतो.अशा अधिकाऱ्यांनी, न्यायाधीशांनी, संपादकांनी प्रामाणिकपणे, पारदर्शक काम केले असेल का, असा प्रश्न उपस्थित होतो. त्यांची

### समाजाने काय अपेक्षा करावी

या अधिकाऱ्यांनी सरकारी पदाचा राजीनामा देऊन विविध औद्योगिक कंपन्यांमध्ये मोठ्या पदावर मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांवर रुजू झाले होते. हे अधिकारी कंपन्यांच्या कामांचे प्रस्ताव घेऊन पुन्हा मंत्रालयात फेऱ्या मारताना दिसत होते, अशा प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून समाजाने काय अपेक्षा करावी.

निष्ठा नेमकी कुणावर असेल. समाजाप्रती असलेले कर्तृव्य त्यांनी नीट पार पाडले असले का, अशी शंका निर्माण होते. समाजही अशा घटना निमूटपणे पाहत राहतो, हे धोकादायक आहे, असेही कुबेर म्हणाले. ब्रिटनमध्ये एका प्रशासकीय अधिकाऱ्याच्या साक्षीने पंतप्रधान बोरीस जॉन्सन यांना टाळेबंदीच्या काळात मित्रांचा मेळावा आयोजित केल्याप्रकरणी राजीनामा द्यावा लागला होता. पण, तिथे साक्ष देणाऱ्या अधिकाऱ्यावर ईडी किंवा अन्य यंत्रणेने धाड टाकली नाही. इतके निकोप वातावरण तिथे आहे. काही वर्षांपूर्वी आपल्याकडे एकाच वेळा अकरा राजीनामा दिल्याची घटना घडली होती.

## अटकही ठरवली वैध

## बेल्जियमकोर्टाची भारताकडे प्रत्यार्पणाला दिली मान्यता

# मेहुल चोक्सीला मोठा झटका!

### प्रत्यार्पणाला बेल्जियम कोर्टाने मान्यता दिली



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पंजाब नॅशनल बँकेच्या सुमारे १३ हजार कोटींच्या फसवणुकीच्या प्रकरणात फरार मेहुल चोक्सी याला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शुक्रवारी बेल्जियम येथील एका न्यायालयाने हिरे व्यापारी मेहूल चोक्सी याचे भारताकडे प्रत्यार्पण करण्यास मान्यता दिली आहे. तसेच न्यायालयाने बेल्जियमच्या अधिकाऱ्यांकडून झालेली त्याची अटक वैध असल्याचा निर्णय दिला आहे.**

या प्रकरणाची माहिती असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, चोक्सी याल भारतात आणण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, मेहुल चोक्सी याच्याकडे अद्याप वरिष्ठ न्यायालयात या निर्णयाच्या विरोधात अपील करण्याचा पर्याय आहे. त्यामुळे त्याला लगेचच आणले जाऊ शकत नाही , मात्र पहिला आणि खूप महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.यापूर्वी बेल्जियमच्या अँटवर्प येथील न्यायालयाने शुक्रवारी भारतच्या बाजूने आणि चोक्सीच्या वतीने बेल्जियमच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला आणि त्याची अटक आणि भारताची प्रत्यार्पणाची विनंती पूर्णपणे वैध असल्याचा निर्णय दिला. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने केलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीच्या अधारे ११ एप्रिल रोजी अँटवर्प पोलिसांनी ६५ वर्षीय चोक्सीला अटक केली होती आणि तो चार महिन्यांहून अधिक काळ तुरुंगात आहे. चोक्सीने बेल्जियमच्या विविध न्यायालयांमध्ये जामिनासाठी अर्जही केला होता, पण त्याचा अर्ज फेटाळण्यात आला.मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी हे पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यात आरोपी आहेत.मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी यांनी १३ हजार ५०० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. नीरव मोदी आणि मेहुल चोक्सी यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून त्यांच्या मालकीच्या कंपन्यांना एलओयू(लेटर ऑफ अंडरटेकिंग), फॉरेन लेटर्स ऑफ क्रेडिट मिळवल्याचा आरोप आहे.सुमारे १३ हजार कोटींच्या फसवणुकीच्या प्रकरणात फरार मेहुल चोक्सी याला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शुक्रवारी बेल्जियम येथील एका न्यायालयाने हिरे व्यापारी मेहूल चोक्सी याचे भारताकडे प्रत्यार्पण करण्यास मान्यता दिली आहे. तसेच न्यायालयाने बेल्जियमच्या अधिकाऱ्यांकडून झालेली त्याची अटक वैध असल्याचा निर्णय दिला आहे.या प्रकरणाची माहिती असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, चोक्सी याल भारतात आणण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, मेहुल चोक्सी याच्याकडे अद्याप वरिष्ठ न्यायालयात या निर्णयाच्या विरोधात अपील करण्याचा पर्याय आहे. त्यामुळे त्याला लगेचच आणले जाऊ शकत नाही , मात्र पहिला आणि खूप महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.यापूर्वी बेल्जियमच्या अँटवर्प येथील न्यायालयाने शुक्रवारी भारतच्या बाजूने आणि चोक्सीच्या वतीने बेल्जियमच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला आणि त्याची अटक आणि भारताची प्रत्यार्पणाची विनंती पूर्णपणे वैध असल्याचा निर्णय दिला. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने केलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीच्या अधारे ११ एप्रिल रोजी अँटवर्प पोलिसांनी ६५ वर्षीय चोक्सीला अटक केली होती आणि तो चार महिन्यांहून अधिक काळ तुरुंगात आहे. चोक्सीने बेल्जियमच्या विविध न्यायालयांमध्ये जामिनासाठी अर्जही केला होता, पण त्याचा अर्ज फेटाळण्यात आला.मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी हे पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यात आरोपी आहेत.मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी यांनी १३ हजार ५०० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.

### प्रत्यार्पण करण्यास मान्यता

बँकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून त्यांच्या मालकीच्या कंपन्यांना एलओयू(लेटर ऑफ अंडरटेकिंग), फॉरेन लेटर्स ऑफ क्रेडिट मिळवल्याचा आरोप आहे.पंजाब नॅशनल बँकेच्या सुमारे १३ हजार कोटींच्या फसवणुकीच्या प्रकरणात फरार मेहुल चोक्सी याला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शुक्रवारी बेल्जियम येथील एका न्यायालयाने हिरे व्यापारी मेहूल चोक्सी याचे भारताकडे प्रत्यार्पण करण्यास मान्यता दिली आहे.

# गडचिरोलीच्या प्रशासकीय मॉडेलचा दिल्लीत डंका!

## जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुर्गम आणि आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्याच्या प्रशासकीय कारभाराची आज राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. 'आदी कर्मयोगी अभियाना'अंतर्गत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांना आज राष्ट्रपती भवनात एका दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'उत्कृष्ट सार्वजनिक प्रशासना'च्या पुरस्काराने गौरवण्यात आले.**

महाराष्ट्रातून हा सन्मान मिळवणारा गडचिरोली हा एकमेव जिल्हा ठरला आहे.तळागाळातील नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'आदी कर्मयोगी अभियान' प्रभावीपणे राबवले. याअंतर्गत ५५३ 'आदी सेवा केंद्रे' आणि ग्राम कृती आराखड्यांच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या सोयी थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आल्या. तसेच, ५ लाख हेक्टरहून अधिक वनजमिनीचे हक्क ग्रामसभांना देऊन त्यांचे सक्षमीकरण करण्यात आले. हा पुरस्कार संपूर्ण गडचिरोली जिल्हा प्रशासन आणि येथील नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांचा सन्मान आहे.शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याच्या आमच्या संकल्पाला या पुरस्काराने नवी ऊर्जा मिळाली आहे,"

अशी भावना जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केली. जिल्हाधिकारी पंडा यांनी भारत सरकारकडे या यशस्वी प्रशासकीय मॉडेलचे सादरीकरण केले होते. त्यांच्या या कार्याला मिळालेली ही राष्ट्रीय पोचपावती गडचिरोली जिल्ह्यासाठी एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे.ल गडचिरोली जिल्ह्याच्या प्रशासकीय कारभाराची आज राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. 'आदी कर्मयोगी अभियाना'अंतर्गत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांना आज राष्ट्रपती भवनात एका दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'उत्कृष्ट सार्वजनिक प्रशासना'च्या पुरस्काराने गौरवण्यात आले. महाराष्ट्रातून हा सन्मान मिळवणारा गडचिरोली हा एकमेव जिल्हा ठरला आहे. तळागाळातील नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'आदी कर्मयोगी अभियान' प्रभावीपणे राबवले.

### एकत्रित प्रयत्नांचा सन्मान

आरोग्य आणि उपजीविकेच्या सोयी थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आल्या. तसेच, ५ लाख हेक्टरहून अधिक वनजमिनीचे हक्क ग्रामसभांना देऊन त्यांचे सक्षमीकरण करण्यात आले.हा पुरस्कार संपूर्ण गडचिरोली जिल्हा प्रशासन आणि येथील नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांचा सन्मान आहे.

# रोहितच्या सिंघम अगेनमध्ये अर्जून हा खलनायकाच्या भूमिकेत

बॉलीवूडमध्ये आपल्या आगळ्या वेगळ्या धाटणीच्या अभिनयासाठी प्रसिद्ध असणाऱ्या अर्जुन कपूरचा आता आगामी प्रोजेक्ट हा चाहत्यांच्या कुतूहलाचा विषय आहे. तो प्रख्यात दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या सिंघम अगेनमध्ये दिसणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. एका मुलाखतीमध्ये अर्जुन कपूरनं जी प्रतिक्रिया दिली आहे ती चर्चेत आली आहे. आपला प्रवास, आपले प्रोजेक्ट अन् आगामी काळातील वाटचाल यावर त्यानं दिलेली प्रतिक्रिया त्याच्या विषयी खूप काही सांगून जाणारी आहे. अर्जुनचं म्हणणं आहे की, चाहत्यांचं माझ्यावर असलेलं प्रेम मी समजू शकतो पण माझ्या काही खास भूमिका आहेत. रोहित शेट्टीच्या सिंघम अगेन मध्ये अर्जुन हा खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. त्याच्या सध्या व्हायरल झालेल्या लूक्सची चर्चा आहे. तो म्हणतो की, मला वेगवेगळ्या भूमिका करायला आवडतात ,जर दिग्दर्शकाला वाटत असेल की एखादी वेगळी भूमिका करू शकतो तर मी ती करणारच . सिनेमा हे माझे प्रेम आहे सिनेमासाठी जे त्याला पडद्यावर साकारण्यासाठी निवडलेल्या भूमिकांचा प्रयोग मला करायला आवडते. अर्जुन म्हणतो, "मी कधीही अभिनेता व्हायचं असं ठरवलं नव्हतं. मात्र मी चित्रपटांच्या प्रेमात पडलो



कारण मी आपल्या देशातील लोकांना आनंददायी मनोरंजन देण्यासाठी काही करु इच्छितो. "मला जेव्हा अभिनयाचा अनुभव घ्यायचा होता तेव्हा मला फक्त अभिनयच करायचा होता. कॅमेऱ्याला सामोरे जायचे होते. मला पडद्यावर रोल करण्यासाठी निवडले गेले यावर मी कधीच नाराजही झालो नाही. मला तो आनंद घ्यावासा वाटला. ती प्रक्रिया जाणून घ्यावीशी वाटली. अर्जुन पुढे म्हणतो की, इश्कजादेमध्ये नायकाच्या भूमिकेसाठी त्याची ऑडिशन घेतली जात होती हे त्याला माहिती नव्हतं. "मुख्य भूमिकेत लाँच होणं ही आदित्य रॉय कपूरची इच्छा होती. त्याला माझं काम आवडलं होतं. मी कधीच ऑडिशन दिले नाही! ही भूमिका मिळाल्यावर मी भारावून गेलो होतो. मला तो दिवस अजूनही आठवतो. तो कदाचित माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदी दिवसांपैकी एक होता." अर्जुन म्हणतो मी कधीही कुणापासून असुरक्षिततेची भावना असणारा अभिनेता नव्हतो.

## चर्चा बॉबीचीच!

बॉलीवूड फिल्म इंडस्ट्रीमध्ये मानाचा समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कार वितरण सोहळा नुकताच पार पडला असून त्यामध्ये वेगवेगळ्या सेलिब्रेटींना गौरविण्यात आले आहे. यंदाच्या पुरस्कार सोहळ्यात सर्वाधिक चर्चा रंगली ती किंग खान शाहरुख अन् बॉबी देओलची. सोशल मीडियावर बॉबीवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव सुरु केला आहे. ॲनिमल या संदीप रेड्डी वांगाच्या चित्रपटामध्ये बॉबी देओलनं साकारलेल्या नकारात्मक भूमिकेबद्दल त्याला दादासाहेब फाळके पुरस्कारानं गौरविण्यात आले आहे. हा पुरस्कार स्विकारल्यानंतर बॉबी हा भावूक झाल्याचे दिसून आले आहे. तब्बल दीड दशकानंतर बॉबीनं बॉलीवूडमध्ये केलेलं पुनरागमन हे त्याच्या करिअरसाठी चांगलेच लाभदायी ठरताना दिसत आहे.बॉबीनं प्रकाश झा यांच्या आश्रम नावाच्या मालिकेमध्ये निराला बाबाची भूमिका साकारुन प्रेक्षकांची पसंती मिळवली होती. आता या मालिकेचा चौथा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## बैलाबरोबर केलं शूटिंग



'तुजं माजं सपान' ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका आहे. या मालिकेचं वेगळं कथानक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं आहे. पण सध्या ही मालिका एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. मालिकेतील नायिका प्राजक्ताने चक्क बैलाबरोबर शूटिंग केलं आहे. अभिनेत्रीच्या या धाडसाचं सध्या मालिकाप्रेमींकडून कौतुक होत आहे. एका वेगळ्या धाटणीची कलाकृती व त्यातून जपली जाणारी सामाजिक आणि कौटुंबिक बांधिलकी यांचं उत्तम उदाहरण म्हणजे 'तुजं माजं सपान' ही सोनी मराठीवरील मालिका. प्रेक्षकांनी उचलून धरलेली ही गावाकडची गोष्ट त्यांना आपलीशी वाटण्यांचं कारणच मुळात त्याच्या विषयात आहे. नावीन्यपूर्ण विषय आणि त्याला साजेशी कलाकारांची साथ, या मालिकेला उजवं ठरवते. क्षेत्र मग ते कुठलंही असो स्त्रिया आपली आवड आणि कर्तव्यं यांची सांगड अगदी लीलया घालताना दिसतात. 'तुजं माजं सपान' ही मालिका हेच अधोरेखित करते आहे. सामान्य घरातील प्राजक्ताला रांगड्या मर्दानी खेळाचं, कुस्तीचं पडलेलं स्वप्नं आणि तिला पहिलवान वीरूची असलेली भक्कम साथ यांची अनोखी कथा 'तुजं माजं सपान' या मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांना पाहायला मिळेल.

## कियाराचा पत्ता कट!

प्रसिद्ध अभिनेत्री कियारा अडवाणीची डॉन ३ मध्ये निवड झाली मात्र तिच्या हातून भूल भुलैय्या ३ गेल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या सगळ्यात कोणत्या अभिनेत्रीला त्या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली आहे याविषयी चाहत्यांना उत्सुकता आहे. कार्तिक आर्यनचा हॉरर कॉमेडी भूल भुलैय्या ३ हा चर्चेत आला आहे. गेल्या (काही दिवसांपासून त्याविषयी नेटकरी बोलू लागले आहेत. या चित्रपटामध्ये विद्या बालनची इंट्री झाली आहे. मात्र त्यातून धक्कादायक बातमी म्हणजे कियारा अडवाणीचा पत्ता त्यातून कट झाल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. तिच्या जागी बॉलीवूडच्या दुसऱ्या प्रसिद्ध अभिनेत्रीची निवड झाल्याचे सांगण्यात येत आहे.पहिल्यांदा मेकर्सच्या वतीनं सांगण्यात आले होते की, भुलभूलैय्याच्या तिसऱ्या भागामध्ये तब्बू ऐवजी विद्या बालनच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर आता मुख्य भूमिकेसाठी कियारा अडवाणीचे नाव चर्चेत होते तिच्या ऐवजी बॉलीवूडच्या प्रसिद्ध अभिनेत्रीचे नाव प्रकाशझोतात आले आहे. त्या अभिनेत्रीचे नाव तृप्ती डिमरी असे आहे. ज्यांनी संदीप रेड्डी वांगाचा ॲनिमल पाहिला असेल त्यांना त्या अभिनेत्रीविषयी वेगळं सांगण्याची गरज नाही. भुलभूलैय्याच्या तिसऱ्या भागात बॉलीवूडचा चर्चेतील सेलिब्रेटी दिसणार असल्याचे बोलले जात आहे. या सगळ्यात कार्तिक आर्यननं मोठी घोषणा केली असून त्यानं कियारा ऐवजी त्या चित्रपटामध्ये तृप्ती डिमरी दिसणार असल्याचे सांगितल्याची माहिती आहे.बऱ्याच दिवसांपासून या रिप्लेसमेंटची चर्चा होती. अखेर कियाराच्या नावाला डावलून दुसऱ्या एका नावाला मेकर्सकडून हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे.

## रकुल प्रीत सिंगचा लग्नानंतरचा पहिला व्हिडीओ



बॉलीवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आणि अभिनेता जॅकी भगनानी यांचा शाही विवाहसोहळा आज ( २१ फेब्रुवारी ) गोव्यात पार पडला. जॅकी-रकुलच्या लग्नाला कुटुंबीयांसह अनेक बॉलीवूड कलाकार आणि त्यांचे जवळचे मित्र-मैत्रिणी उपस्थित राहिले होते. लग्नसोहळा पार पडल्यावर हे दोघेही पहिल्यांदाच माध्यमांसमोर आले आहेत. 'वरिंदर चावला'ने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये जॅकीने पांढऱ्या रंगाची शेरवानी परीधान केल्याचं पाहायला मिळत आहे. तर, रकुल प्रीतने लग्नसोहळ्यात बेबी पिंक रंगाचा सुंदर असा लेहेंगा, त्यावर भरजरी दागिने असा आकर्षक लूक केल्याचं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. लग्नानंतर पहिल्यांदाच ते माध्यमांसमोर आले, तेव्हाचा हा त्यांचा व्हिडीओ आहे. दक्षिण गोव्यातील आलिशान हॉटेलमध्ये रकुल-जॅकीच्या लग्नाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यांच्या लग्नात वरुण धवन, राज कुंद्रा, भूमी पेडणेकर, शिल्पा शेट्टी, आयुष्मान खुराना, अर्जुन कपूर, डेव्हिड धवन, आदित्य रॉय कपूर, अनन्या पांडे असे अनेक बॉलीवूड सेलिब्रिटी सहभागी झाले होते. या जोडप्यावर आता नेटकऱ्यांसह कलाविश्वातून कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. दरम्यान, गोव्यात लग्नबंधनात अडकल्यावर आता रकुल व जॅकी लवकरच मुंबईत एका भव्य रिसेप्शन पार्टीचं आयोजन करणार आहेत. याशिवाय दोघांच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर रकुल प्रीत लवकरच 'इंडियन २' चित्रपटात झळकणार आहे. तसेच जॅकी 'बडे मिया छोटे मिया' या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. यामध्ये प्रेक्षकांना अक्षय कुमार, टायगर श्रॉफ, सोनाक्षी सिन्हा, पृथ्वीराज सुकुमारन अशी तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे.

प्लॅन कोणाचा होता?

## भारतीय खेळाडूंनी हस्तांदोलन करणं टाळलं

# ‘नो हँडशेक’चा प्लॅन कोणाचा होता?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय टी -२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने द इंडियन एक्सप्रेसकडून आयोजित करण्यात आलेल्या ‘एक्सप्रेस अड्डा’ या खास कार्यक्रमाला हजेरी लावली. यादरम्यान त्याने द इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे कार्यकारी संचालक अनंत गोएंका आणि द इंडियन ग्रुपचे उप सहयोगी संपादक देवेंद्र पांडे यांच्यासोबत चर्चा केली. यादरम्यान त्याने आशिया चषक स्पर्धेत गाजलेल्या नो हँडशेकबाबत मोठा खुलासा केला आहे.**

## सूर्यकुमार यादवने मोठा खुलासा केला




आशिया चषक २०२५ स्पर्धेदरम्यान भारत – पाकिस्तान यांच्यातील सामन्याहून अधिक चर्चा नो हँडशेकची रंगली. भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंसोबत हस्तांदोलन करणं टाळलं होतं. दरम्यान हा प्लॅन नेमका कोणाचा होता? याबाबत सूर्यकुमार यादवने आता खुलासा केला आहे.सूर्यकुमार यादव म्हणाला, “मी त्यादिवशी तो एक निर्णय घेतला. योगायोगाने त्याच दिवशी माझा वाढदिवसही होता. त्यामुळे मला वाटलं हा योग्य दिवस आहे. आम्ही ड्रेसिंग रुममध्ये सर्वांनी मिळून हा निर्णय घेतला. पण मला माहीत नव्हतं की मी प्रत्यक्षात ही भूमिका घेईल. पण देशासाठी पुढाकार घेण्यात काहीच गैर नाही.”तसेच तो पुढे म्हणाला, “सुरुवातीला काही लोकांनी, खेळायचंय का? असा प्रश्न विचारला होता. पण नंतर आम्ही घेतलेल्या भूमिकेचे सकारात्मक परिणाम दिसून आले. पण नंतर मला वाढदिवसाच्या शुभेच्छा मिळाल्या.” असं सूर्यकुमार यादव म्हणाला.या स्पर्धेत भारतीय संघाने एकही सामना गमावला नाही. भारताने पाकिस्तानला ३ वेळा पराभूत केलं. अंतिम सामन्यातही भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात तिलक वर्माच्या दमदार खेळीच्या बळावर भारतीय संघाने जेतेपदाचा मान मिळवला. पण सामना जिंकूनही भारतीय संघाला ट्रॉफी दिली गेली नव्हती. भारतीय खेळाडूंनी एसीसीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे मोहसीन नक्वी ट्रॉफी घेऊन निघून गेले होते. ही ट्रॉफी भारतीय संघाला अजूनही दिली गेलेली नाही.आशिया चषक २०२५ स्पर्धेदरम्यान भारत – पाकिस्तान यांच्यातील सामन्याहून अधिक चर्चा नो हँडशेकची रंगली. भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंसोबत हस्तांदोलन करणं टाळलं होतं. दरम्यान हा प्लॅन नेमका कोणाचा होता? याबाबत सूर्यकुमार यादवने आता खुलासा केला आहे.सूर्यकुमार यादव म्हणाला, “मी त्यादिवशी तो एक निर्णय घेतला. योगायोगाने त्याच दिवशी माझा वाढदिवसही होता. त्यामुळे मला वाटलं हा

## मी प्रत्यक्षात ही भूमिका घेईल

दरम्यान हा प्लॅन नेमका कोणाचा होता? याबाबत सूर्यकुमार यादवने आता खुलासा केला आहे.सूर्यकुमार यादव म्हणाला, “मी त्यादिवशी तो एक निर्णय घेतला. योगायोगाने त्याच दिवशी माझा वाढदिवसही होता. त्यामुळे मला वाटलं हा योग्य दिवस आहे. आम्ही ड्रेसिंग रुममध्ये सर्वांनी मिळून हा निर्णय घेतला. पण मला माहीत नव्हतं की मी प्रत्यक्षात ही भूमिका घेईल.

योग्य दिवस आहे. आम्ही ड्रेसिंग रुममध्ये सर्वांनी मिळून हा निर्णय घेतला. पण मला माहीत नव्हतं की मी प्रत्यक्षात ही भूमिका घेईल. पण देशासाठी पुढाकार घेण्यात काहीच गैर नाही.”तसेच तो पुढे म्हणाला, “सुरुवातीला काही लोकांनी, खेळायचंय का? असा प्रश्न विचारला होता. पण नंतर आम्ही घेतलेल्या भूमिकेचे सकारात्मक परिणाम दिसून आले. पण नंतर मला वाढदिवसाच्या शुभेच्छा मिळाल्या.” असं सूर्यकुमार यादव म्हणाला.या स्पर्धेत भारतीय संघाने एकही सामना गमावला नाही. भारताने पाकिस्तानला ३ वेळा पराभूत केलं. अंतिम सामन्यातही भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात तिलक वर्माच्या दमदार खेळीच्या बळावर भारतीय संघाने जेतेपदाचा मान मिळवला. पण सामना जिंकूनही भारतीय संघाला ट्रॉफी दिली गेली नव्हती. भारतीय खेळाडूंनी एसीसीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे मोहसीन नक्वी ट्रॉफी घेऊन निघून गेले होते. ही ट्रॉफी भारतीय संघाला अजूनही दिली गेलेली नाही.भारतीय टी -२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने द इंडियन एक्सप्रेसकडून आयोजित करण्यात आलेल्या ‘एक्सप्रेस अड्डा’ या खास कार्यक्रमाला हजेरी लावली. यादरम्यान त्याने आशिया चषक स्पर्धेत गाजलेल्या नो हँडशेकबाबत मोठा खुलासा केला आहे. आशिया चषक २०२५ स्पर्धेदरम्यान भारत – पाकिस्तान यांच्यातील सामन्याहून अधिक चर्चा नो हँडशेकची रंगली. भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंसोबत हस्तांदोलन करणं टाळलं होतं.

# शुबमन गिल वनडेचा कर्णधार

## सूर्यकुमार यादवला वाटतेय भीती? म्हणाला, “भीती वाटते कारण

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय टी -२० संघ येत्या काही दिवसात ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. दोन्ही संघ ३ वनडे आणि ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहेत. वनडे मालिकेसाठी भारतीय संघ ऑस्ट्रेलियाला रवाना झाला आहे. टी -२० मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाला रवाना होण्यापूर्वी भारतीय टी -२० संघाचा कर्णधार सूर्यकमार यादवने ‘एक्सप्रेस अड्डा’ला हजेरी लावली.**




द इंडियन एक्सप्रेसकडून आयोजित करण्यात आलेल्या ‘एक्सप्रेस अड्डा’ या कार्यक्रमात इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे कार्यकारी संचालक अनंत गोएंका आणि इंडियन एक्सप्रेसचे उप-सहयोगी संपादक देवेंद्र पांडे यांच्याशी भारतीय टी -२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने संवाद साधला. काही दिवसांपूर्वीच शुबमन गिलची वनडे संघाच्या कर्णधारपदी नेमणूक करण्यात आली आहे. गिल वनडे संघाचा कर्णधार बनल्यानंतर टी -२० संघातील स्थान गमावण्याची भीती वाटते का? असा प्रश्न विचारला असता सूर्यकुमार यादव म्हणाला, “ मी

## २ फॉरमॅटमध्ये कर्णधार

त्यामुळे जी भीती होती, ती भीती मी खूप मागे सोडली आहे.“ असं सूर्यकुमार यादव म्हणाला.शुबमन गिलची वनडे आणि कसोटी संघाच्या कर्णधारपदी नेमणूक करण्यात आली आहे. गिलबाबत बोलताना सूर्या म्हणाला, “त्याची २ फॉरमॅटमध्ये कर्णधार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. मला त्याच्यासाठी खूप आनंद होत आहे.

खोटं बोलणार नाही. प्रत्येकाला या गोष्टीची भीती वाटतेच. पण ही अशी भीती आहे जी आणखी काहीतरी चांगलं करण्यासाठी प्रेरित करते.”याबाबत बोलताना तो पुढे म्हणाला, “शुबमन आणि माझे मैदानावरील आणि मैदानाबाहेरील संबंध खूप चांगले आहेत. त्यामुळे तो एक माणूस म्हणून आणि एक खेळाडू म्हणून कसा आहे हे मला माहीत आहे. त्यामुळे तो मला चांगली कामगिरी करण्यासाठी प्रेरित करतो.”तसेच तो पुढे म्हणाला की, “जर मी इतका घाबरलो असतो तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मी माझा पहिला चेंडू ज्या पद्धतीने खेळलो ते खेळू शकलो नसतो.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार ।

। दि. 18 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### संस्कृतीचा गंध जपणारा भाजपा युवा मोर्चाचा स्तुत्य उपक्रम

# वसुबारसेला गोधनाचा सन्मान करत गोरक्षणाचा संकल्प!

## भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव यांच्या पुढाकारातून पार पडला कार्यक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिखली व कुदळवाडी परिसरात वसुबारसच्या निमित्ताने पारंपरिक गाय-वासरांचे पूजन अत्यंत श्रद्धा आणि उत्साहात पार पडले. या कार्यक्रमामध्ये भाजपा युवा मोर्चाच्या पुढाकारातून अध्यक्ष दिनेश यादव यांच्या संकल्पनेतून, केवळ धार्मिक परंपरा नव्हे तर गोरक्षणाची सामाजिक आणि संस्कृतिक जाणीव ही अधोरेखित करण्यात आली.**



> "आजच्या धावपळीच्या युगात आपल्या संस्कृतीशी असलेली नाळ कायम ठेवणे गरजेचे आहे. वसुबारस ही एक परंपरा नसून, भारतीय मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. या निमित्ताने समाजाने गोरक्षणासाठी सजग होणे ही काळाची गरज आहे."
> **-दिनेश यादव,** अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर

चंद्रभागा गोशाळा (रामदास नगर), पै. निलेश यादव फार्म (कुदळवाडी), गणेश किसन आप्पा यादव फार्म (इंद्रायणी वजन काट्या मागे) या ठिकाणी पारंपरिक पद्धतीने गाय व वासरांचे पूजन करण्यात आले. गोभक्त, महिला मंडळ आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमात गाय केवळ एक पवित्र प्राणी नाही, तर ती आपल्या संस्कृतीची मूळ प्रेरणा आहे. असा संदेश देण्यात आला. उपस्थित नागरिकांनी केवळ पूजनापुरते न थांबता, वर्षभर गोसेवेसाठी कार्यरत राहण्याचा संकल्पही केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपा युवा मोर्चाचे कार्यकर्ते, स्थानिक गोसेवक, महिला मंडळ व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# डीपीयू महाविद्यालयाचा अभिमानास्पद विजय!

## आंतरमहाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धाः मुला मुलींच्या संघाला अजिंक्यपद

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**निगडी येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्रा. सी.सी.ई.ई. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी येथील मुला आणि मुलींच्या संघांनी अनुक्रमे प्रथम क्रमांक पटकावत दोन्ही गटांत अजिंक्यपद मिळवले.**



स्पर्धेची सुरुवात होताच या संघांनी आपली तयारी, प्रबळ आत्मविश्वास आणि उत्कृष्ट समन्वयाचे दर्शन घडवले. प्रत्येक सामन्यात त्यांनी आपल्या कौशल्याने प्रतिस्पर्ध्यांना नमवले. सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले. या यशामध्ये खेळाडूंनी घेतलेली मेहनत, तसेच, मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचे आणि क्रीडा विभागाचे योगदानही अत्यंत मोलाचे ठरले. हा दुहेरी विजय महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील एक सुवर्णक्षण ठरला असून, या यशामुळे संपूर्ण महाविद्यालय परिवाराचे मनोबल उंचावले आहे. या उत्तम कामगिरीबद्दल सर्व खेळाडूंना, त्यांच्या प्रशिक्षकांना आणि क्रीडा विभागाला डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सर्व ट्रस्टींच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

## “एक मुट्ठी अनाज” उपक्रमातून

# विद्यार्थ्यांमध्ये रुजले सामाजिक भान!

## शिक्षण विश्व: मोशीतील प्रियदर्शनी स्कूलचा कौतुकास्पद उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी यांच्यातर्फे “एक मुट्ठी अनाज” या उपक्रमांतर्गत दुसऱ्या वर्षीही अन्नदान अभियानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी, पालकांनी आणि शाळेच्या शिक्षकवर्गाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गरजू संस्थांसाठी धान्य, खाद्यपदार्थ आणि इतर आवश्यक साहित्याचे संकलन केले.या अभियानाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये यामुळे सामाजिक जाणवेची मूल्ये रुजली गेली.**




शाळेच्या मुख्याध्यापिका आशा रेड्डी , रझिया लखानी, ईपीटीए सदस्य शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी मिळून स्वामी समर्थ वृद्धाश्रम (चिखली), सावली निवारा (पिंपरी) आणि अंधशाळा (भोसरी) या तीन संस्थांना प्रत्यक्ष भेट दिली. त्यांनी संकलित साहित्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांकडे प्रेमपूर्वक सुपूर्द केले. या उपक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सामाजिक क्षेत्राचा अनुभव घेता आला. समाजातील दुर्बल घटकांच्या अडचणी, गरजा आणि त्यांना दिलासा देण्याचे महत्त्व या भेटीद्वारे त्यांना समजले. विद्यार्थ्यांच्या मनात सहानुभूती, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीची बीजे रोवली गेली या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान नव्हे, तर माणुसकी आणि जबाबदारीचे भावही रुजले असून, हा उपक्रम भावी काळातही अधिक व्यापक रूपात राबवण्याचा निर्धार शाळेने व्यक्त केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकोटांचा होणार गौरव!

## पिंपरी चिंचवडमध्ये भाजपा युवा मोर्चातर्फे ‘किल्ले बनवा स्पर्धा 2025’चे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि गडकिल्ल्यांची शौर्यगाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने किल्ले बनवा स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.**

### अध्यक्ष दिनेश यादव यांच्याकडून युवकांना सहभागी होण्याचे आवाहन




याबाबत भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष दिनेश यादव म्हणाले, या स्पर्धेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या किल्ल्यांची माहिती, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि रचना, शैली युवा पिढीला समजावी, तसेच शिवकालीन संस्कृतीचा सन्मान व्हावा हा उद्देश आहे. ही स्पर्धा केवळ पिंपरी चिंचवड शहरापुरती मर्यादित आहे. स्पर्धकाच्या वयावर कोणतीही बंधनं नाहीत. परीक्षणावेळी शिवरायांची मूर्ती किंवा प्रतिमा किल्ल्याजवळ ठेवून पूजन करणे अनिवार्य आहे. स्पर्धकाने स्वतः तयार केलेल्या किल्ल्याची ऐतिहासिक माहिती सांगणे आवश्यक आहे.

पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा यास प्राधान्य दिले जाईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येईल

### अशी करा नोंदणी

स्पर्धेसाठी नोंदणी ऑनलाइन पद्धतीने करता येणार आहे. इच्छुकांनी (HTTPS://FORMS.GLE/HTEJEBRKZK577PGO7) या लिंकवर जाऊन नोंदणी करावी.

### पर्यावरणपूरकतेला प्राधान्य

या स्पर्धेत पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. म्हणजेच माती, कागद, लाकूड, गवत, गोंद अशा नैसर्गिक साधनांचा वापर करून किल्ला तयार करावा. प्लास्टिक वा अपघातकारक साहित्य वापरल्यास गुण कमी दिले जातील, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील, असेही जाहीर करण्यात आले.

**सर्व वयोगटांसाठी खुली संधी**

ही स्पर्धा पिंपरी चिंचवड शहरापुरती मर्यादित असून वयावर कोणतीही बंधने ठेवण्यात आलेली नाहीत. लहान मुले, युवक, महिला किंवा वरिष्ठ नागरिक – सर्वांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध आहे. प्रत्येक सहभागीला प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. विजेत्या स्पर्धकांना गौरवचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

“ या उपक्रमाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहरातील शिवप्रेमी आणि कलाप्रेमी युवक-युवतींना आपले कौशल्य आणि शिवभक्ती व्यक्त करण्याची उत्तम संधी मिळणार आहे. जास्तीत जास्त युवकांनी यामध्ये सहभाग नोंदवावा.
**–दिनेश यादव,** अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, पिंपरी चिंचवड शहर.

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

# EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# Admission Open

## FOR 2026 – 27

## Nursery – Std X



- **CBSE** Curriculum
- **Separate Sports Teachers** for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with **AV Facilities**
- **Skill Development Programs** including:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on **Holistic Development**

**Enroll Now!**

Sunday Open: From 10 AM to 1 PM

**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

## What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development



**Enroll Now!**

**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune